| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | Sunday 16th August, 2020 | Publication: | Punya Nagari (Marathi) [Mumbai] |
| Journalist: | Bureau | Page No: | 2 |
| MAV/CCM: | 12570/12.57 | Circulation: | 15,479 |



# आता मीटर रीडिंग करा मोबाईलमधून

**मुंबई** : अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत नव्या मोबाईल ॲपची घोषणा केली असून यानुसार ग्राहकांना स्वतःचे मीटर रीडिंग स्वतःच्या मोबाईलवरून करता येणार आहे. तसेच बिलाची पावती, बोटांचे ठसे यासह दर महिन्याच्या वीज वापराची अचूक माहिती बसल्या जागी मिळणार आहे.

**अदानी इलेक्ट्रिसिटीकडून नवे ॲप दाखल**

अदानी समूहाने डिजिटल क्रांती साधत ग्राहकांच्या निरंतर बदलत्या गरजा लक्षात घेत ग्राहक केंद्रित वैशिष्ट्य सादर करीत ॲप दाखल केले आहे. मीटर रीडिंग नोंदवणे, देयक भरल्याची पावती मिळवणे या गोष्टीसह बोटांचे ठसे, चेहरा यांच्याबरोबरच ओटीपीद्वारे लॉग-इन, नजीकचे कस्टमर केअर सेंटर, जीनियस पे किऑस्कची माहिती तसेच महिनागणिक वीज वापराच्या प्रवाहाला जाणून घेण्यास मदत होणार आहे. तसेच देयक भरणा, देयकाची प्रत डाऊनलोड करणे, मीटर रीडिंग तपासणे आणि भरलेल्या देयकांची माहिती, वीजदराची माहिती ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. अदानी इलेक्ट्रिसिटीच्या ॲपवर ग्राहक लॉग-इन करून नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून नऊ अंकी खाते क्रमांक, बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख पटवून करू शकणार आहेत. जर ग्राहकाला त्याच्या खात्यासंबंधी विशिष्ट माहिती व्हॉट्सॲप संदेशाच्या रूपात हवी असेल तर तसा पर्याय ते नवीन ॲपच्या माध्यमातून मिळवू शकणार आहेत. या सेवांबाबत अदानी इलेक्ट्रिसिटीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कंदर्प पटेल यांनी तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. सध्या हे ॲप ॲंड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही व्यासपीठांवर उपलब्ध असून नवीन वापरकर्त्यांना १५ ऑगस्टपासून ॲप स्टोअर आणि प्ले स्टोअर येथून डाऊनलोड करता येणार असल्याचेही पटेल यांनी स्पष्ट केले.